

राजमाता
अहिल्यादेवी
होळकर
जयंतीच्या
हार्दिक
शुभेच्छा!

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-३६ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. २६ मे २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४

## रविकांत राठोड व मुकेश राठोड यांच्यात निवडणुकीच्या पैसे देवाणघेवाणवरून वाद; खंडणीचा गुन्हा हा चोरांनीच रचलेला कुभांड -अमृता चव्हाण

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयातील सातारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत काही आठवड्यांपासून बंजारा समाजातील काही सामाजिक कार्यकर्त्यांच्या तक्रारीवरून निर्माण झालेल्या वादाकडे राज्यातील बंजारा समाजाचे लक्ष लागलेले असून सदर पोलीस ठाण्यातील सदर प्रकरणाशी संबंधित असलेले पोलीस अधिकारी वादात सापडण्याची शक्यता वाढलेली आहे.

बंजारा ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष रविकांत राठोड याचे सामाजिक व राजकीय काळे कारनामे स्वतःच्या कृकृत्याने उघडकीस येऊ लागले आहे. सातारा परिसरातील रहिवासी असलेल्या महिला तक्रारदार अमृता चव्हाण यांनी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पोलीस आयुक्त व इतर अधिकाऱ्यांना दिलेल्या तक्रारीत अनेक गंभीर मुद्दे उपस्थित करून बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे भटके विमुक्त विभागाचे पदाधिकारी रविकांत राठोड याला त्याच्या संघटनेतून काही महिन्यांपूर्वी बाहेर पडलेले व सध्या राष्ट्रवादी बंजारा परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रेमदास दाजीबा राठोड यांच्या मदतीने राष्ट्रीय बंजारा नवनिर्माण सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मुकेश राठोड यांच्यासोबत काही प्रमुख महिला पदाधिकाऱ्यांविरोधात नियोजनपूर्वक खंडणीचा गुन्हा दाखल करून पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीबद्दलच शंका निर्माण केलेली आहे.

रविकांत राठोड यांनी अमृता चव्हाण यांच्या वडिलांकडून आरटीजीएसने घेतलेले काही लाख रुपये बुडवण्यासाठी सदर महिलेला मानसिक त्रास देत असल्याने त्याच्या विरुद्ध सातारा पोलीस





ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करताच कार्यवाही केल्याचा फायदा रविकांत राठोड सदर संधीचा वापर इतरांना त्रास देण्यासाठीच करीत आहे.

अमृता चव्हाण यांनी दिलेली तक्रार परत परत घ्यायला लावण्यासाठी रविकांत राठोड यांनी पाळलेले गुंड ज्ञानेश्वर चव्हाण उर्फ चिकू अमोल चव्हाण यापूर्वीही त्यांनी दबाव आणला होता याशिवाय प्रतिभा अनिल गायकवाड हिला अमृता चव्हाण ला मारहाण करायला लावण्याच्या नीचपणाही रविकांत राठोड यांनी केला आहे याशिवाय अमृता चव्हाण ही विदेशात गेलेली असल्याच्या संधीचा फायदा घेऊन खंडणीच्या गुन्ह्यात फरार असल्याची माहिती वाईट हेतूने पसरवली ज्यामुळे अमृता चव्हाण यांची बदनामी झाली. परिणामी अमृता चव्हाण यांनी मुकेश राठोड यांची नार्को टेस्ट करावी ज्यामुळे जे सत्य आहे ते बाहेर येईल अशी मागणी तक्रार अर्जद्वारे केलेली आहे.

अमृता चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीवरून सातारा पोलीस ठाण्यात रविकांत राठोड याच्याविरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यातील कलमा बदलून घेण्यासाठी दररोज पोलीस ठाण्यात चकरा मारत असल्याचेही तक्रारीत नमूद केलेले आहे.

अमृता चव्हाण यांना संघटनेत पद देऊन इतर कामे देण्याची लालूच दाखवून रविकांत राठोड ने आठ ते नऊ लाख रुपये त्यांच्याकडून लागलेले आहे असेही तक्रारीत नमूद केले आहे. रविकांत राठोड व मुकेश राठोड यांनी मिळून लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत संघटनेचा पाठिंबा देण्यासाठी उमेदवारी मागे घेण्यासाठी काही पक्ष व अपक्ष उमेदवाराकडून घेतलेल्या पैशाच्या हिश्श्यावरून वाद असल्याचेही माननीय मुख्यमंत्री व इतरांना दिलेल्या तक्रारीत अमृता चव्हाण यांनी नमूद केले आहे.

मुकेश राठोड यांनी त्याच्या हिश्याचे पैसे वसूल करण्यासाठी परस्पर रचलेला हा कुभांड आहे. या प्रकरणात मुकेशला ताब्यात घेऊन चौकशी केल्यास सगळ्या बाबी स्पष्ट होतील. असे अमृता चव्हाण यांनी तक्रारीत म्हटले आहे याशिवाय अमृता चव्हाण वापरत असलेली (एम.एच. २०, डीव्ही ५१४७) सदर लोकांनी पळून नेलेली आहे याबाबत १७ मे २०२५ रोजी पुंडलिक नगर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याचे ही त्यांनी तक्रारीत नमूद केलेले आहे. रविकांत राठोड यांच्या संघटनेचे कार्यकर्ते स्वतः अमृता चव्हाण यांना त्यांच्या आई-वडील भाऊ व जवळच्या नातेवाईकांकडे बदनामी करण्याची व पोलिसात तक्रार करण्याची धमकी देत आहेत. रविकांत राठोड याला राजकीय पाठबळ असल्याने पोलीस प्रशासनाची त्यास मदत मिळत असल्याचेही तक्रारीत नमूद आहे. अमृता चव्हाण यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांना रविकांत राठोड व त्यांच्या संघटनेचे गुंड कार्यकर्त्यांपासून धोका आहे. त्यांच्या जीवाचे काही बरे वाईट झाल्यास रविकांत राठोड, शासन, प्रशासन, जबाबदार राहील. तरी रविकांत राठोड व मुकेश राठोड यांना ताब्यात घेऊन चौकशी करून न्याय द्यावा, अशी मागणी अमृता गंगाधर चव्हाण यांनी २३ मे २०२५ रोजी शासन प्रशासनास लेखी तक्रार अर्जद्वारे मागणी केलेली आहे.

## शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

### मान्सूनच्या प्रवासाची गती लवकरच कमी होणार असल्यामुळे राज्यात पावसात घट होणार

मुंबई : या वर्षी मान्सूनचा प्रवास वेगाने सुरु असल्यामुळे तो २५ मे रोजी दक्षिण कोकणात दाखल झाला आहे, जे सामान्य तारखेपेक्षा १० दिवस आधीच आहे. मात्र २७ मे पासून मान्सूनच्या प्रवासाची गती कमी होणार असल्यामुळे राज्यातील हवामानात लवकरच मोठे बदल दिसून येतील. सध्याच्या अंदाजानुसार २७ मे पासून राज्यातील हवामान हळू हळू कोरडे होईल आणि काही प्रमाणात तापमानात वाढ देखील होईल.

मे महिन्याच्या शेवटपर्यंत कोकण वगळता बहुतांश भागात प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे, आणि किमान ५ जूनपर्यंत ही स्थिती कायम राहणार असल्याचा अंदाज आहे. यामुळे किमान ५ जूनपर्यंत तरी राज्यातील बहुतांश भागात मान्सून दाखल होण्याची आणि मान्सूनच्या पावसाची शक्यता दिसत नाही. या दरम्यान देशातील इतर भागात सुद्धा मान्सूनचा प्रवास तात्पुरता थांबू शकतो.

**मान्सून महाराष्ट्रात दाखल! भारतीय हवामान विभागाची अधिकृत घोषणा**

मुंबई : गेल्या आठवडाभरापासून राज्यात विविध भागात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. मे महिन्याच्या उन्हाळ्याच्या झळा त्यामुळे कमी झाल्या असल्या तरीही...

या वर्षी राज्यातील अनेक भागात दमदार मान्सून पूर्वीचा वादळी पाऊस पडला आहे. आपल्या भागात मान्सून लवकरच दाखल होईल अशी अपेक्षा करून अथवा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतक-यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. हवामान कोरडे होणार असल्यामुळे जर पेरणीची घाई केली तर शेतक-यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## छत्रपती संभाजीराजे यांचे भव्य स्मारक खुलताबादेत साकारणार-आ. संजय केणेकर

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

खुलताबाद ही जशी सुफी संतांची भूमी आहे तशीच ती ऐतिहासिक पार्श्वभुमी असलेली आहे,ज्या संभाजी महाराजांना मुघल सम्राट औरंगजेबाने अनन्वित छळ करून मारले,त्या औरंगजेबाचे नामोनिशाण मिटवून खुलताबादेत संभाजी राजे यांचे भव्य दिव्य स्मारक उभारण्यासाठी आपले अविरत प्रयत्न राहणार असून,यामुळे खुलताबादची नवी ओळख निर्माण होईल असे प्रतिपादन विधानपरिषद सदस्य आमदार संजय केणेकर यांनी खुलताबादेत शनिवारी (दि.२४) केले.

खुलताबाद येथील जाज्वल्य दैवत श्री भद्रा मारोती मंदिरास आमदार केणेकर यांनी भेट देवून भद्र हनुमानाचे दर्शन घेवून अभिषेक केला,यानंतर महा आरती करण्यात आली.यावेळी संवाद साधताना आमदार केणेकर म्हणाले, खुलताबाद शहरात होणारी विविध मंदिरासमोर होणारी म हाआरती आता ग्रामीण भागातही सुरु करण्यात येईल, त्याद्वारे संघटन मजबुती हा एकच उद्देश असल्याचे स्पष्ट केले.यावेळी त्यांच्या समवेत भा.ज.पा.(पश्चिम) चे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे शहराध्यक्ष परसराम बारगळ ज्ञानेश्वर बारगळ सुरेश मरकड माजी उपसभापती दिनेश अंभोरे सतीश दांडेकर राहुल हजारे. अविनाश कुलकर्णी. अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष मुक्तार पठाण. शेख बशीर. गणेश सावजी सोनू भावसार यांचे सहा मोठ्या संख्येने भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. विशेष म्हणजे आमदार झाल्यापासून पहिल्यांदाच खुलताबादला आल्याने त्यांच्या भव्य सत्कार खुलताबाद तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने करण्यात आले.

## रस्त्यावर वाहन लावणाऱ्याना बसणार दंड; मनपाच्या ॲप तुम्हीही अपलोड करू शकाल फोटो

छत्रपती संभाजीनगर : घरासमोर रस्त्यात वाहन उभे करणाऱ्यांना आता लवकरच महापालिकेच्या कारवाईचा दंडूका बसणार आहे. अशा लोकांमुळे गल्ल्यांमधून दुसरे वाहन जात नाही. आपात्कालिन परिस्थितीत अग्निशमन दलाचे वाहन, रुग्णवाहिका जाऊ शकत नाही. त्यामुळे नागरिकांनी तक्रार केली तर अशी वाहने थेट उचलून नेण्यात येणार आहे. लवकरच यासंदर्भात धोरण निश्चित केले जाईल.

महापालिका प्रशासक जी. श्रीकांत यांनी शुक्रवारी (२३ में) पत्रकार परिषदेत सांगितले, की महापालिकपा क्लीन स्ट्रीट ॲप लॉन्च करत असून, नागरिकांनी त्या वाहनाचा फोटो या ॲपवर अपलोड करायचा आहे. सोबत गुगल लोकेशन दिल्यास मनपाची यंत्रणा वाहन उचलण्याचे काम करेल. माहिती देणाऱ्याचे नाव सांगितले जाणार नाही, असे ते म्हणाले. रस्त्यांवरच घरासमोर दुचाकी, चारचाकींचे पार्किंग केलेले असते.




संकटकाळात छोटी ॲम्ब्युलन्स, अग्निशमन दलाचे वाहनसुद्धा ये- जा करू शकत नाही. रात्री एखाद्याला हॉस्पिटलमध्ये न्यायचे म्हटले तर साधी रिक्षाही जाऊ शकत नाही, अशी बिकट परिस्थिती आहे. आपल्या ग्राहकांसाठी पार्किंग उपलब्ध करून देणे, ही व्यापाऱ्यांची जबाबदारी आहे. नागरिकांनीही रात्री आपली वाहने रस्त्यावर उभी न करता खासगी जागेत उभी करावीत. पार्किंगची शिस्त हवी या दृष्टीने महापालिकेने अभ्यास सुरू केला असल्याचे त्यांनी सांगितले. डे-नाईट पार्किंग शुल्क वसुलीसाठी कंत्राटदार निश्चित केला जाणार असून, त्यासाठी लवकरच निविदा काढण्यात येणार असल्याची माहितीही प्रशासकांनी दिली.

## डी.एड परीक्षेला डमी विद्यार्थी; दोघांवर गुन्हा दाखल

**छत्रपती संभाजीनगर** : डी.एड परीक्षेला उर्दू अध्यापन पद्धती या विषयाच्या परीक्षेला डमी परिक्षार्थी बसल्याचा प्रकार समोर आला आहे. यात परिक्षार्थीसह डमि विद्यार्थ्यावर देखील वेदांत नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मूळ परिक्षार्थी खालीद खूर्शिद व डमि परिक्षार्थी इरफान सुलेमान शेख (मुक्काम पोस्ट पानवाडी, फुलंब्री, जिल्हा छत्रपती संभाजीनगर) अशी आरोपीचे नाव आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत डी.एडच्या परीक्षा सुरू होत्या. त्यात ३० एप्रिल रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास शासकीय अध्यापक महाविद्यालयात उर्दू अध्यापन पद्धती विषयाचा पेपर सुरू होता. त्यावेळी खालीद खूर्शिद याच्या जागेवर बसलेला विद्यार्थी आणि हॉल तिकीटवर दिसणारा विद्यार्थी वेगळा असल्याचे केंद्र प्रमुखाच्या लक्षात आले. त्यांनी याबाबत इतरांना माहिती देत विद्यार्थ्याची चौकशी केल्यावर इरफान सुलेमान शेख याने खालीदने मला परीक्षेला पाठवले असल्याचे कबूल केले. त्यानंतर विद्यापीठातील परीक्षा विभागात याबाबत सुनावणी होऊन हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा अधिक तपास उपनिरीक्षक सुपे करत आहे.

## संपादकीय

# अहिल्याबाई होळकर या केवळ एक महान शासकच नव्हे तर पराक्रमी योद्धा आणि सर्वश्रुत धनुर्धर

**अहिल्याबाई** होळकर यांचे चरित्र वाचल्यानंतर स्त्री शक्ती किती महान आहे, ती आपल्या आयुष्यात काय करू शकते याचे उदाहरण आपल्याला मिळेल. जीवनात कितीही संकटे आली तरी त्यांना कसे सामोरे जायचे हे अहिल्याबाईच्या जीवनातून शिकले पाहिजे. अहिल्याबाई होळकर यांनी त्यांच्या आयुष्यात खूप संकटांचा सामना केला पण त्यांनी कधीच हार मानली नाही, त्यामुळेच भारत सरकारने त्यांचा सन्मानही केला, त्यांच्या नावाने टपाल तिकीटही काढण्यात आले आणि आज त्यांनी अहिल्याबाई यांच्या नावाने पुरस्कारही दिला जाते.

महाराणी अहिल्याबाई होळकर या भारतातील माळवा राज्याच्या मराठा होळकर राणी होत्या. अहिल्याबाईचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर, महाराष्ट्रातील चोंडी गावात झाला. त्यांचे वडील माणकोजीराव शिंदे हे त्यांच्या गावचे पाटील होते. त्या काळी स्त्रिया शाळेत जात नव्हत्या, पण अहिल्याबाईच्या वडिलांनी त्यांना लिहायला-वाचायला शिकवलं. अहिल्याबाईचे पती खंडेराव होळकर १७५४ च्या कुंभेर युद्धात शहीद झाले. १२ वर्षांनंतर त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. एका वर्षानंतर, तिला माळवा राज्याची सम्राज्ञी म्हणून राज्याभिषेक करण्यात आला. तिने नेहमीच मुस्लिम आक्रमकांपासून आपले साम्राज्य वाचवण्याचा प्रयत्न केला. उलट युद्धाच्या वेळी ती स्वतः तिच्या सैन्यात सामील होऊन लढत असे. त्यांनी तुकोजीराव होळकरांना आपल्या सैन्याचा सेनापती म्हणून नेमले. महाराणी अहिल्याबाईनीही आपल्या राज्यात महेश्वर आणि इंदूरमध्ये अनेक मंदिरे बांधली होती. यासोबतच त्यांनी लोकांना राहण्यासाठी अनेक धर्मशाळाही बांधल्या, गुजरातमधील द्वारका, काशी विश्वनाथ, वाराणसीचा गंगा घाट, उज्जैन, नाशिक, विष्णुपद मंदिर आणि बैजनाथ या प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या आसपास त्यांनी या सर्व धर्मशाळा बांधल्या. मुस्लिम आक्रमकांनी उद्ध्वस्त केलेली मंदिरे पाहून त्यांनी सोमनाथमध्ये शिवमंदिर बांधले. ज्याची हिंदू आजही पूजा करतात.

इंदूर राज्याचे संस्थापक महाराज मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव यांच्याशी तिचा विवाह झाला. अहिल्याबाईना १७४५ मध्ये एक मुलगा आणि तीन वर्षांनी मुलगी झाली. मुलाचे नाव मालेराव आणि मुलीचे नाव मुक्ताबाई. तिने कुशलतेने पतीचा अभिमान जागृत केला. काही दिवसातच खंडेराव आपल्या थोर वडिलांच्या मार्गदर्शनाखाली चांगला शिपाई बनला. मल्हाररावांनाही पाहून त्यांचेही समाधान झाले. ते सुनेला व सून अहिल्याबाईनाही राज्यकारभाराचे शिक्षण देत असत. तिची हुशारी आणि हुशारी पाहून तो खूप खूष झाला. मल्हाररावांच्या हयातीत त्यांचा मुलगा खंडेराव १७५४ मध्ये मरण पावला. त्यामुळे मल्हाररावांच्या मृत्यूनंतर राणी अहिल्याबाईनी राज्याची सूत्रे हाती घेतली. राणी अहिल्याबाईनी १७५४ मध्ये तिच्या मृत्यूपर्यंत अत्यंत कुशलतेने राज्य केले. त्यांची गणना आदर्श राज्यकर्त्यांमध्ये केली जाते. तो त्याच्या औदार्य आणि उदारतेसाठी ओळखला जातो. त्यांना एकुलता एक मुलगा होता, मलाराव जो १७६६ मध्ये मरण पावला. १७६७ मध्ये अहिल्याबाईनी तुकोजी होळकरांना सेनापती म्हणून नियुक्त केले.

**अहिल्याबाई होळकर यांचा जन्म व बालपण** – इ.स. १७२५ सालचा तो दिवस प्रभातकाळच्या सूर्यकिरणांनी सुवर्णकांतीने झळाळत होता. त्या सोनेरी किरणांनी संपूर्ण वातावरणच सुवर्णमय होऊन गेले होते. त्यातच डोगरदऱ्यांमध्ये वसलेल्या चौंडी गावचे दृश्य फ्फारच विलोभनीय वाटत होते. सर्वांच्या चेहऱ्यावर आनंदोत्सवाचे तेज झळकत होते. सर्वत्र आनंदोत्सव साजरा केला जात होता. सगळीकडे अद्भुतरम्य दृश्य पहावयास मिळत होते. नेहमीपेक्षा त्या दिवसाचे म हत्त्व अधिक होते; कारण तो दिवस उजेडला त्याच दिवशी भारतामध्ये पुढे घडणाऱ्या वैभवशाली इतिहासाची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्या दिवसाचे सोनेरी किरण म्हणजे देशाच्या वैभवशाली इतिहासाचे सोनेरी पानच होते. तो दिवस म्हणजे भविष्यकालीन सुप्रसिद्ध ऐतिहासिक घटनांची नांदी होता. कारण त्या दिवशी एका महान ‘कर्मयोगिनी’ने या भूतलावर जन्म घेतला होता.

मराठवाडा विभागातील चौंडी हे एक गाव. गाव तसं छोटंसंच; पण नाना प्रकारच्या वनस्पतींनी आणि लहान मोठ्या टेकड्यांनी नटलेले रमणीय आणि मनमोहक. जणू काही निसर्गाने आपल्या सहस्र बाहूंनी त्या गावाला सौंदर्य प्रदान केले होते. याच गावामध्ये सद्भावी आणि सात्त्विक आचरणशील मनोवृतीचे आदर्श गृहस्थ श्री. मानकोजी शिंदे आपल्या पत्नी सौ. सुशीलाबाई शिंदे यांच्यासहित राहत होते. त्यावेळेस चौंडी गावची पाटीलकी त्यांच्याकडेच होती. घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम होती. गावचा कारभार ते उत्तमरीतीने हाताळत असत. मानकोजी शिंदे हे स्वत: धार्मिक वृतीचे गृहस्थ होते. सुशीलाबाई शिंदे या धार्मिक, विनयशील, ज्ञानी त्याचबरोबर आदर्श कर्तव्यदक्ष गृहिणी होत्या. पूजाअर्चा करणे,

पान ३ वर

# राष्ट्रीय ब्रदर्स डे-लाडक्या भावांसाठी प्रेमळ दिवस

**जरी ब्रदर्स डेची उत्पत्ती कशी झाली याबद्दल पुरेशी तथ्ये नसली तरी, असे म्हटले जाते की हा दिवस पहिल्यांदा २००५ मध्ये अलाबामा, यूएसए येथील डॅनियल रोड्स यांनी साजरा केला होता, जे व्यवसायाने कलाकार आणि लेखक होते. ब्रदर्स डेच्या सुरुवातीचे श्रेय त्यांना जाते. हळुहळू या उत्सवाला झपाट्याने लोकप्रियता मिळाली आणि तेव्हापासून दरवर्षी २४ मे हा दिवस ब्रदर्स डे म्हणून साजरा केला जाऊ लागला, यावर प्रकाश टाकणारा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर महत्त्वपूर्ण संकलित लेख... संपादक.**

दरवर्षी आपण मदर्स डे, फादर्स डे, सिबलिंग डे साजरा करतो, त्याचप्रमाणे भावासाठी एक खास दिवस असतो, जो ब्रदर्स डे म्हणून साजरा केला जातो. दरवर्षी २४ मे हा राष्ट्रीय बंधू दिन म्हणून साजरा केला जातो. नावाप्रमाणेच, हा दिवस भावांबद्दल प्रेम आणि आपुलकी व्यक्त करण्यासाठी साजरा केला जातो. लहानपणापासून ती मोठी होईपर्यंत ज्यांच्याशी आपण आपल्या सगळ्या गोष्टी शेअर करतो ती म्हणजे भावंडे. एकत्र खाण्याच्या, खेळण्याच्या, मौजमजा करण्याच्या अगणित आठवणी आपल्या हृदयात आणि मनात घर करून राहतात.आपण आपल्या भावंडांसोबत आयुष्यातील प्रत्येक गोष्ट शेअर करतो, ती दुःखी असतात तेव्हा आपण दुःखी असतो आणि ती आनंदी असतात तेव्हा हसतो. भावासोबतचे तेच क्षण आठवण्याचा आणि भावाला खास वाटण्याचा आजचा दिवस आहे.

**ब्रदर्स डे चा इतिहास:** जरी ब्रदर्स डेची उत्पत्ती कशी झाली याबद्दल पुरेशी तथ्ये नसली तरी, असे म्हटले जाते की हा दिवस पहिल्यांदा २००५ मध्ये अलाबामा, यूएसए येथील डॅनियल रोड्स यांनी साजरा केला होता, जे व्यवसायाने कलाकार आणि लेखक होते. ब्रदर्स डेच्या सुरुवातीचे श्रेय त्यांना जाते. हळुहळू या उत्सवाला झपाट्याने लोकप्रियता मिळाली आणि तेव्हापासून दरवर्षी २४ मे हा दिवस ब्रदर्स डे म्हणून साजरा केला जाऊ लागला,

**ब्रदर्स डे चे महत्व:** सन २००५ पासून सुरू झालेली ब्रदर्स डे सेलिब्रेशनची ही मालिका आता जगातील अनेक देशांमध्ये पसरली आहे. आज ब्रदर्स डेची लोकप्रियता



अमेरिकेपासून फ्रान्स, जर्मनी, भारत, चीन आणि रशियासारख्या इतर देशांमध्ये चांगली दिसते. या सर्व देशांमध्ये दि. २४ मे रोजी लोक आपल्या भावासोबत त्यांना खास वाटण्यासाठी उत्सव साजरा करतात. खऱ्या भावांव्यतिरिक्त, इतर लोक जसे चुलत भाऊ, मावस भाऊ आणि मित्र सुद्धा आपल्या आयुष्यात भावाची उणीव भरून काढू शकतात. तसेच ते नेहमी भावांसारखे आपल्यासाठी उभे असतात. खरे तर प्रत्येक माणसाच्या आयुष्यात किमान एक तरी भाऊ असला पाहिजे, ज्याच्याकडून तो प्रामाणिक सल्ला घेऊ शकेल, आपले मत बोलू शकेल, त्याच्यासोबत मजा करू शकेल. तो भाऊ, मित्र, नातेवाईक किंवा तुमच्यासाठी खास कोणीही असू शकतो. तुम्ही तुमच्या भावांना फिटनेस, ग्रूमिंग आणि स्टाइलिंगच्या वस्तू भेट देऊ शकता, ज्या प्रत्येक वेळी ते वापरतील तेव्हा ते तुम्हाला लक्षात ठेवतील.



– संकलन व शब्दांकन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

**गॅझेट:** मुलांना गॅजेट्स आवडतात. तुम्ही तुमच्या भावाला कोणतेही गॅजेट्स गिफ्ट केल्यास तो खूप आनंदी होऊ शकतो. फोन गिफ्ट केला जाऊ शकतो पण जर तुमचे बजेट कमी असेल किंवा भावाकडे आधीच चांगला फोन असेल, तर तुम्ही मनोरंजन किंवा फिटनेसशी संबंधित गॅजेट्स भेट करू शकता.

**सनग्लासेस:** सनग्लासेस केवळ सूर्य आणि धुळीपासून डोळ्यांचे संरक्षण करत नाहीत तर स्टाईल देखील जोडतात. सनग्लासेस देखील मुलांसाठी ॲक्सेसरीजचा एक आवश्यक भाग आहेत, म्हणून त्यांना चांगल्या दर्जाचे सनग्लासेस भेट द्यावे..

**परफ्यूम:** परफ्यूमचा वापर फक्त मुलीच करत नाहीत तर मुलेही करतात आणि उन्हाळ्यात त्याची गरज खूप वाढते. त्यामुळे या निमित्ताने आम्ही त्यांना चांगल्या कंपनीचे परफ्यूम गिफ्ट करू शकतो.

**फिटनेस उपकरणे:** जर तुमचा भाऊ फिटनेसकडे लक्ष देत असेल, जिम आणि व्यायामाची आवड असेल तर आपण त्याला फिटनेसशी संबंधित वस्तू देऊ शकतो. डंबेल्स, बॉक्सिंग किट, जिम बॅग किंवा बाटली इत्यादी भावाला भेट म्हणून देऊ शकतो. त्यांच्या गरजेनुसार आणि आवडीनुसार भेटवस्तू निवडावी.

**कस्टमाइज गिफ्ट:** याशिवाय तुम्ही तुमच्या खास पुरुषांना कस्टम इज्ड गिफ्टही देऊ शकता. जसे की मोबाईल कव्हर, कॉफी मग किंवा टी-शर्ट. यावर तुम्ही त्याच्या किंवा तुमच्या दोघांशी संबंधित कोणत्याही संस्मरणीय क्षणाचा फोटो किंवा संदेश लिहू शकता.

दरवर्षी २४ मे रोजी, आम्ही राष्ट्रीय बंधू दिन साजरा करतो, हा दिवस भावांमधील अनोख्या संबंधाचा सन्मान करण्यासाठी. बंधू, जैविक किंवा अन्यथा, आपले जीवन कसे समृद्ध करतात यावर विचार करण्याची संधी हा दिवस आहे. नॅशनल ब्रदर्स डेची उत्पत्ती २००५ पासून झाली, जेव्हा अलाबामा येथील सी.डॅनियल रोड्स यांनी पहिल्यांदा सुट्टीचे आयोजन केले होते. राष्ट्रीय ब्रदर्सडे निमित्त समस्त भावांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभकामना जी..

# महावितरण कंपनीमध्ये पुनर्रचनेच्या नावाखाली महापारेषण प्रमाणे कामगार कपात तर होतं नाही ना?

## महावितरणच्या शाखा कार्यालयांना कात्री
## उपविभागही घटणार; ग्राहक सेवेचा उडणार बोजवारा

**महावितरण** कंपनीच्या पुनर्रचनेच्या हालचाली सुरू आहेत. या पुनर्रचनेत राज्यातील शाखा कार्यालयांना कात्री लागणार आहे. उपविभागीय कार्यालयांच्या संख्येत घट होणार आहे त्यामुळे ग्राहक सेवेचा बोजवारा उडण्याचा धोका आहे.

ग्राहक संख्या वाढत असताना शाखा कार्यालयापासून विभागीय कार्यालयापर्यंत संख्या वाढविण्याची आवश्यकता असताना पुनर्रचनेत मात्र कात्री लावण्याचा प्रकार सुरू आहे. या विरोधात कर्मचारी संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्यात सध्या तीन कोटींपर्यंत वीज ग्राहक आहेत. शहरी आणि ग्रामीण भागात विद्युत यंत्रणेचे जाळे असून त्याच्या देखभाल गरज शाखा कार्यालयाची, तरतूद मात्र नियंत्रण कार्यालयाची वीज ग्राहकांना प्रत्यक्ष सेवा देण्यासाठी शाखा कार्यालयांसह वायरमन, अभियंते, लिपिक अशा घटकांची नितांत गरज आहे.

कंपनीने मात्र गेल्या दहा वर्षांत ही गरज पूर्ण करण्यापेक्षा नियंत्रण कार्यालयांची म्हणजेच प्रादेशिक कार्यालयाची निर्मिती केली आहे. प्रकाशगड मुख्यालयात प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र संचालकपद कार्यरत आहे.त्यामुळे प्रादेशिक कार्यालये म्हणजे पांढरा हत्ती पोसण्याचा प्रकार असल्याची चर्चा आहे. दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणात तांत्रिक कर्मचाऱ्यांची आवश्यकत आहे. सध्या राज्यात मुंबईत प्रकाशगड हे मुख्य कार्यालय आहे.नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोकण आणि पुणे ही चार प्रादेशिक कार्यालये आहेत.१६ झोन कार्यालये असून ४४ सर्कल(जिल्हा) कार्यालये आहेत. याबरोबरच १४५ डिव्हीजन कार्यालये असून ६४६ उपविभाग कार्यालये कार्यरत आहेत. याबरोबरच ग्राहकांना त्यांच्या भागात गावात सेवा मिळावी, यासाठी ३ हजार २४७ शाखाकार्यालये आहेत. एका विभागीय कार्यालयात चार उपविभाग केले जाणार आहेत. सध्या साठ हजार ग्राहकांसाठी एक उपविभाग अशी रचना असून नव्या रचनेत १ लाख २० हजार ग्राहकांसाठी उपविभाग करण्याचे नियोजन भौगोलिक परिस्थितीचा विचार नाही उपविभाग कमी करताना भौगोलिक परिस्थतीचा विचार केला नाही. दुर्गम भागातील गावांत आजही लाईनस्टाफला पायपीट करावी लागते. त्यामुळे ग्राहकांना सेवा मिळण्यात अडचणी येतात.त्यामुळे नवीन पद्धतीत थेट कार्यालयांची कपात केल्याने पाच ते दहा किलोमीटरवर ग्राहकांना पायपीट करावी लागणार आहे.एवढा मोठ्या प्रमाणात कार्यालयांचा व्याप असूनही आजही अनेक ठिकाणी ग्राहकांना सेवा मिळत नाही. ग्राहक संख्या वाढल्याने वीजपुरवठा खंडित होणे,नवीन कनेक्शन वेळेत न मिळणे, बीज बिल वाढून येणे, विद्युत भार वाढविणे कमी करणे आदींसह अनेक कामांबाबत ग्राहकांना प्रतीक्षा करावी लागते.असे असताना कार्यालयांची संख्या वाढविण्याऐवजी कमी करण्याचा घाट घातला जात आहे.आता नव्याने होणाऱ्या पुनर्रचनेत शाखा कार्यालयांना कात्री लावण्यात आली आहे. शाखा कार्यालये नावालाच ठेवून तेथे फक्त दोन कर्मचारी तक्रार घेण्यासाठी आहेत. त्या तक्रारीचे निरासन उपविभागामार्फत करण्याचे नियोजन आहे. शाखा कार्यालयांतर्गत सध्या सात हजार ग्राहकांचा समावेश आहे.एका उपविभागांतर्गत पाच ते सहा शाखा कार्यालये असूनही सेवा मि ळत नाही. त्यामुळे नव्या रचनेमुळे उपविभागात ग्राहकांच्या तक्रारीची दखल कोण घेणार का? असा संतप्त सवाल केला जात आहे. महापारेषण पुनर्रचनेसारखे महावितरणचेही होणार.

प्रशासनाच्या भुलथापाला बळी न पडता पूर्ण अभ्यासपूर्ण विचार करूनच या नवीन पुनर्रचनेला सर्व कर्मचाऱ्यांनी मान्यता द्यावी नसता या विरोधात आंदोलन करावे नसता भविष्य अंधारात आहे. काही संघटनांनी तर भविष्यात येणाऱ्या अडचणीचा काडीमात्रही विचार न करता या पुनर्रचनेला पाठिंबाही देऊन टाकला आहे.

# माई रमाई यांच्या राष्ट्रीय स्मारकांची पाय उभारणी करणार की नाही शासनाला सवाल - बागडे




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

कोट्यवधी समाजाची मावली ज्यांनी या देशाचा कोहिनूर रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी खंबीरपणे सावली बनून उभी राहिली या माई रमाई यांचे वरली स्मशानभूमीत राष्ट्रीय स्मारकाची पाय उभारणी करणार की नाही असा सवाल आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी शासनाला केला येत्या २७ मे रोजी माई रमाई यांची पुण्यतिथी निमित्त तरी शासनाने घोषणा करावी.

राज्य शासनाने नुकतीच अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकासाठी मोठी निधी वाजवा गाजवा करून घोषित केली आम्हाला आनंद झाला आम्ही साखर वाटून तोंड गोड केले याच धर्तीवर माई रमाई यांच्या स्मारकासाठी कधी घोषणा होईल या साठी मोठ्या आतुरतेने आंबेडकरी, पुरोगामी समाज वाट बघत आहे. मागिल कित्येक वर्षांपासून वरली स्मशानभूमी येथे माई रमाई चे स्मारक झाले पाहिजे या करिता आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा सह विविध संघटना पायपीट करत आहे आमच्यातले कित्येक नेते वर्तमान शासनाच्या दारात मांडवली करून बसले आहे तरी चक्क एक शब्द मुखातून बाहेर निघत नाही हि मोठी शोकांतिका आहे.

बागडे यांनी सांगितले आंबेडकरी कार्यकर्त्यांच्या रेट्यामुळे वरली स्मशानभूमीला माईचे नाव तर मिळाले परंतु स्मारकाचे आराखडे अजून तयार झाले नाही हे भिजत घोंगडे का आहे या साठी आंरिमो राज्यभरात झंझावात करून हा प्रश्न लवकर कशा मार्गी लागेल या करिता येत्या २७ मे पासून अभियानाचा प्रारंभ वरली स्मशानभूमीत माईला अभिवादन करून प्रारंभ करण्यात येणार आहे असे बागडे यांनी माध्यमांना सांगितले.

पान २ वरून

## अहिल्याबाई होळकर या केवळ एक महान शासकच नव्हे तर पराक्रमी योद्धा आणि सर्वश्रुत धनुर्धर

पोथ्या वाचणे, कीर्तन तसेच भागवत सप्ताहात सहभागी होणे, गोरगरिबांची दुःखे दूर करून त्यांना मदत करणे, असा त्यांचा नित्यक्रम होता. इस. १७२५ साली अशा या आदर्श गृहस्थाश्रमींच्या उदरी एक कन्यारत्न जन्मास आले. या बाळाचे नाव अहिल्या ठेवण्यात आले. बाल अहिल्या दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊन लागली होती. दिवसामागून दिवस जात होते. बाल अहिल्येने शिशु अवस्थेतून बाल्यावस्थेत पदार्पण केले होते. मानकोजी शिंदे हे सर्वसामान्य परिस्थितीतील असूनदेखील ते विद्वान आणि दूरदर्शी गृहस्थ होते. त्या काळामध्ये म्हणजे इ. सनाच्या १८व्या शतकामध्ये आजच्यासारखी शिक्षणाची साधने उपलब्ध नव्हती. त्यातच चौंडी हे तर छोटंसं खेडेगाव. तेथे शाळेचीदेखील व्यवस्था नव्हती. मुलाच्या शिक्षणाचा फक्षार बिकट प्रश्न होता. त्या काळच्या समाजामध्ये शिक्षणाविषयी प्रेम, आस्था व जागृती झालेली नव्हती. त्यातच मुलीला शिक्षण देणे म्हणजे त्या समाजाला अमान्य बाब होती. अशा बिकट परिस्थितीमध्ये मानकोजी शिंदे यांनी बाल अहिल्येला शिक्षण देण्याचे ठरविले. अहिल्येच्या शिक्षणाची त्यांनी घरीच व्यवस्था केली. तिच्या अभ्यासात ते नियमित लक्ष देत होते. मुलं म्हणजे देवाघरची फुलं असतात. त्यांना आपण जसा आकार देऊ तशी ती घडत असतात. मुलांच्या जीवनाला आकार देण्याची, घडविण्याची सर्वांत मोठी जबाबदारी ही त्याच्या मतापित्यांवर असते. मुले राष्ट्राची संपत्ती आहेत. उद्या राष्ट्र सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्यावर येणार आहे. भावी पिढीचा आधारस्तंभ तेच आहेत. त्यांच्यावरच संपूर्ण राष्ट्राचे भवितव्य अवलंबून आहे. त्यांना जगद्निर्माता परमेश्वराने आपल्याला दान स्वरूपात प्रदान केलेले आहे. म्हणून सत्कार्यासाठीच त्यांचा उपयोग करून घेण्यातच संपूर्ण मानवजातीचे कल्याण आहे. म्हणून बालकांचे जीवन एक आदर्श जीवन करणे हे आपणा सर्वांचे परमकर्तव्य आहे; परंतु मुलांकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन फक्षारच वेगळा आहे. आपण त्यांना आपल्या सुखाचे भांडार आणि वृद्धापकाळातील आधारस्तंभ समजून त्यांचा सांभाळ करतो. त्यांना सुखीसमाधानी ठेवून त्यांच्या उपजीविकेच्या योग्य त्याचप्रमाणे उत्पन्नाच्या लायक बनवण्यातच आपल्या संपूर्ण कर्तव्याची इती समजतो. आपण त्यांच्यामध्ये असणाऱ्या सुप्त गुणांना जागृत करून वाव देण्याचा कधीच प्रयत्न करत नाहीत. परिणामी मुलांचा विकास खुंटतो आणि राष्ट्राची त्याचबरोबर संपूर्ण मानवजातीची हानी होते. वास्तविक पाहता बालवयातच मनुष्याचे संपूर्ण जीवन प्रतिबिंबित झालेले असते. बालवयात त्याच्यावर होणारे संस्कार हे टिकणारे असतात. म्हणून बालवयात त्याच्यावर सुसंस्कार करण्याचे प्रत्येकाचे परमकर्तव्य आहे. याच वयामध्ये त्याच्यातील सुप्तक्षमता जागृत होतात. ज्ञानग्रहण करण्याची क्षमता याच वयामध्ये वाढीस लागते. मानवाच्या आदर्श जीवनाची बीजे याच वयात रोवली जातात. ज्यांच्यातील सुप्त शक्ती प्रकट करण्यास वाव दिला जातो, तीच मुले यशस्वी होतात. कारण अनेक मुले जन्मास येतात; परंतु उच्चावस्थेत फक्षारच मोजकी मुले गेलेली आपण पाहतो. हे सर्व मानकोजी शिंदे जाणून होते. कारण अहिल्यामातेचे जीवन घडविण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. बालवयात मुले आचरणशील असतात. मानकोजी शिंदे आणि सुशीलाबाई शिंदे हे धार्मिक मनोवृत्तीचे असल्यामुळे घरामध्ये धार्मिक कार्य होत होते. पूजाअर्चा, कीर्तन, प्रवचन, पोथीपठण आदी धार्मिक कार्य सुरू असत. त्याचबरोबर दीनदुबळ्यांच्या प्रति प्रेमभाव व गोरगरिबांना मदत करीत होते. हे सर्व सत्कार्य करत असताना बाल अहिल्या आपल्या मातापित्यांबरोबर असत व त्याही कार्यक्रमात सहभागी होत. जे पाहिले ते आत्मसात करून आचरणात ठसवत होत्या. बालवयातच त्यांच्यावर सात्त्विक आणि धार्मिक सुसंस्कार घडवले गेले होते. म्हणूनच पुढे त्यांचे जीवन 'यावश्चंद्र दिवाकरौ' आदर्श बनले.

# वाढत्या तापमानात मोसंबी फळबागेमध्ये घ्यावयाची काळजी

उन्हाळ्यात वाढत्या तापमानाचा मोसंबी फळबागेवर विपरीत परिणाम होतो. बागेचे वाढत्या तापमानापासुन संरक्षण करणे गरजेचे आहे, त्यासाठी योग्य पाणी व्यवस्थापन , खत व्यवस्थापन, संजिवकांचा वापर व आच्छादन या उपाययोजनांचा वापर करणे गरजचे आहे. वाढत्या तापमनामुळे मोसंबी बागेवर विविध परिणाम दिसुन येतात. मार्चच्या सुरवातीपासुन तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होते. याचा परिणाम फळझाडावर व फळावर होतो. यामध्ये मुख्यत्वे फळगळ होणे, कोवळी फूट करपणे, लहान झाडांची वाढ खुंटणे, पाने सुकने आणि फळावर डाग पडणे असे प्रकार दिसुन येतात. त्यासाठी योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे.



**योग्य पाणी व्यवस्थापन :** उन्हाळ्यामध्ये ठिंबक सिंचन पद्धतीने झाडाला पाणी देने फायद्याचे ठरते, यामुळे 50 ते 60 टक्के पाण्याची बचत होते. ज्या भागात पाण्याची कमतरता आहे त्या भागात ठिंबक सिंचन पद्धतीचा वापर करणे फार फायदेशीर ठरते. मोसंबीच्या १० वर्षावरील झाडाला १६० ते १९० लिटर पाण्याची गरज असते. ठिंबक सिंचनाची सोय नसलेल्या ठिकाणी दांडाने ७ ते ८ दिवसांनी पाणीपुरवठा करावा. जमिनीच्या पोताप्रमाणे पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. बागेस सकाळी किंवा रात्री पाणी दिल्यास पाण्याचा पुरेपुर वापर होतो.

**खत व्यवस्थापन:** मोसंबीतील गुंडी गळ थांबवण्यासाठी योग्य खत व्यवस्थापन करणे फार गरजेचे आहे. यासाठी युरिया 50kg आणी कॅल्शियम नायट्रेट 5kg प्रती एकरी द्यावे.

**संजीवकांचा वापर :** उन्हाळयामध्ये होणारी गुंडीगळ थांबवण्यासाठी संजीवकांचा फार उपयोग होतो. त्यासाठी एन.ए.ए. (प्लानोफिक्स) 30 मिली प्रती 100 लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. फळांचा आकार वाढीसाठी जी.ए. या संजिवकाची 3 ते 4 ग्रॅम प्रति 100 लिटर पाणी घेऊन फवारणी करावी

बोर्डो पेस्टचा वापर : उन्हामुळे झाडातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन खोडावरील साल तडकण्याचे प्रमाण वाढून बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे झाडाच्या खोडाला बोर्डो पेस्ट लावणे अत्यंत गरजेचे आहे. झाडाच्या खेडाला 1 ते 1.5 मिटर उंचीपर्यंत बोर्डो पेस्ट लावावा.

**आच्छादनाचा वापर :** उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होते. अच्छादनांचा वापर केल्यामुळे बाष्पीभवनाचा वेग कमी करता येतो. आणी जमिनितील ओलावा टिकवून ठेवण्यास मदत होते. आच्छादनाकरिता वाळलेले गवत, उसाचे पाचट, भुसा, पालापाचोळा या सेंद्रिय संसाधनांचा वापर करणे फायद्याचे फायद्याचे ठरते. या आच्छादनाची जाडी १२ ते १५ सें. मी. ठेवावी. सेंदिय संसाधने उपलब्ध नसल्यास आच्छादनासाठी पॉलिथिन फिल्मचा वापर करावा.

**आच्छादनाचे फायदे :** जमिनित योग्य तापमान राखण्यास मदत होते. सेंद्रिय संसाधनाचे आच्छादन असल्यास ते कालांतराने कुजुन सेंद्रिय खत तयार होते. जमीनीत जास्त पाणी मुरले जाते. तणांच्या वाढीस मोठ्या प्रमाणात प्रतिबंध बसतो. पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होते आणि उत्पादनातही वाढ दिसुन येते.

**- अक्षय वि. मुळे**

# थोर विचारवंत पांडुरंगशास्त्री आठवले...

**योगेश्वर** कृषी, वृक्षमंदिर, मत्स्यगंधा, घरमंदिर अशा एकापेक्षा एक विलक्षण सामाजिक उपक्रमांचे यशस्वी शिल्पकार, स्वाध्याय परिवाराचे प्रणेते, तत्त्वज्ञान विद्यापीठाचे संस्थापक, थोर विचारवंत, तत्त्वचिंतक पांडुरंगशास्त्री वैजनाथशास्त्री आठवले यांचा जन्म कोकणातील रायगड जिल्ह्यातील 'रोहा' येथे वेदशास्त्रसंपन्न घराण्यात झाला. त्यांचे वडील रोहे येथे सरस्वती संस्कृत पाठशाळा चालवीत होते. या पाठशाळेत पांडुरंगशास्त्री यांचे वडिलांपाशीच प्रारंभिक शिक्षण झाले. दादांच्या आईचे नाव पार्वती होते. आजी सरस्वतीबाईचा छोट्या पांडुरंगवर विशेष जीव होता. आजीचे निधन झाल्यानंतर वैजनाथशास्त्री रोह्याहून मुंबईस स्थलांतरित झाले. त्यांनी मुंबईच्या गिरगाव भागात माधवबाग येथे पाठशाळा सुरू केली आणि याच पाठशाळेत दादांचा भारतीय दर्शनशास्त्रे, वेदान्तासह भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास झाला.

दादा एकपाठी होते. वाचनाची, अभ्यासाची उपजत आवड यामुळे अल्पकाळातच त्यांचा विद्याव्यासंग इतका दांडगा झाला की, अनेक थोर अभ्यासक थक्क होऊन जात. मराठी, संस्कृत, गुजराती, इंग्रजी, हिंदी अशा अनेक भाषांवर त्यांनी प्रभुत्व संपादन केले होते. वयाच्या केवळ बाविसाव्या वर्षी, १९४२ मध्ये त्यांनी वडिलांच्या आज्ञेने भगवद्गीतेवर पहिले प्रवचन दिले आणि त्यांच्या वाग्यज्ञाचा श्रीगणेशा झाला. त्यांनी एका नव्या दृष्टिकोनातून, नव्या समाजाला सहज पटेल, आवडेल अशा शब्दांत आपले विचार मांडले. भक्तीला सामाजिक शक्तीचे रूप दिले.

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शांतता, सलोख्याच्या हेतूने १९५४ साली जपान येथे झालेल्या जागतिक तत्त्वचिंतक परिषदेसाठी पांडुरंगशास्त्री यांना विशेष निमंत्रित केले गेले. तेथे त्यांनी 'कृष्णम वंदे जगद्गुरू' या विषयाद्वारे भारतीय अवतार कल्पनेवर आपले उदात्त, व्यापक विचार मांडून सर्वांना प्रभावित केले. त्यांची विद्वत्ता, मानव कल्याणाची उदात्त, व्यापक भूमिका आणि नवा दृष्टिकोन अमेरिकन तत्त्वचिंतकांना इतका भावला की, त्यांनी अमेरिकन नागरिकत्वाचा प्रस्ताव दादांपुढे ठेवला; पण दादांनी भारतभूमीत राहूनच कार्य करण्याचा आपला मनोदय ठामपणे व्यक्त केला.

१९५५ साली दादांनी 'स्वाध्याय परिवार' या कल्पनेला मूर्त रूप देण्याच्या दृष्टीने एकोणीस स्वाध्यायींना सौराष्ट्रात पाठविले आणि कार्यारंभ केला. 'भक्तिफ्फेरी' असे या अभियानास नाव दिले गेले. आता या स्वाध्यायींची संख्या कित्येक लाख झालेली आहे. 'स्व'ला ओळखा, दुसऱ्यांच्या 'स्व'चा आदर करा, तेजाची पूजा करा, प्रेमभाव जपा, स्वतःला दुर्बल, शूद्र समजू नका, आपल्या हृदयस्थ देवत्वाला ओळखून आत्मगौरव संपादन करा, असे सांगत स्वाध्याय परिवाराचे हे कार्य दादांनी मराठी एवढेच गुजराती बांधवांमध्ये, तेही आदिवासी, कोळी या समाजामध्ये मोठ्या आत्मीयतेने रुजविले. त्यांनी महिन्यातील एक दिवस देवासाठी, समाजासाठी समर्पित भावाने कार्य करण्यास स्वाध्यायींना शिकविले व भक्तीला पूजापाठापलीकडे नेऊन सामाजिक कार्याचा आशय प्राप्त करून दिला. यातून 'योगेश्वर कृषी', 'मत्स्यगंधा' अशा उपक्रमांचा प्रारंभ झाला व ते अपेक्षेपेक्षा अधिक यशस्वी झाले.

स्वाध्याय परिवाराचे कार्य पाहून खुद्द विनोबा भावे यांच्यासारखे भूदान चळवळीचे प्रणेतेही चकित झाले व त्यांनी स्वतःहून पांडुरंगशास्त्रींची भेट घेऊन स्वाध्याय परिवाराच्या कार्याचे सूत्र समजून घेतले. 'स्व'चा आत्मगौरव करीत परस्पर भेद, द्वेष विसरून प्रेमाने माणूस माणसाजवळ आणण्याचा स्वाध्याय हा एक बुद्धिगम्य मार्ग आहे, असे दादांनी त्यांना सांगितले. या दरम्यान पांडुरंगशास्त्री यांनी ठाणे येथे तत्त्वज्ञान विद्यापीठाची स्थापना केली. या विद्यापीठाचे वेगळेपण लक्षात घेऊन भारताचे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी ठाण्याला भेट देऊन तत्त्वज्ञान विद्यापीठाची पाहणी केली व दादांचे विशेष कौतुक केले. दादांनी या विद्यापीठातील अभ्यासक्रमाच्या विदेशांतही शाखा उघडल्या. हिंदू धर्मासह ख्रिश्चन, इस्लाम, हिब्रू अशा विविध धर्मांचा निकोप दृष्टीने अभ्यास करून मग तुलनात्मकदृष्ट्या हिंदुधर्म विचार किती श्रेष्ठ, उदात्त, व्यापक आहे हे विदेशांतील विद्यार्थ्यांना स्वतःच्याच अभ्यासाद्वारे त्यांनी जाणवून दिले. गुजरात, राजस्थानच्या सतत अवर्षणग्रस्त भागांत स्वाध्यायींनी तेथील गावकऱ्यांना बरोबर घेऊन श्रमदानाने ३०० तळी खोदली व पाण्याचा बिकट प्रश्न सोडविण्यात आपले कृतिशील योगदान दिले. तसेच माधववृंद आदी उपक्रमांद्वारे दरवर्षी लाखो झाडे लावून ती चांगली जगविण्याची दक्षताही घेतली. १९८६ साली दादांनी उत्तर प्रदेशातील गंगा-यमुनेच्या संगमस्थळी, प्रयाग येथे 'तीर्थ मिलन' महामेळावा घेतला. या मेळाव्यास तीन लाख स्वाध्यायी सहभागी झाले होते. या मेळाव्याच्या सर्व व्यवस्था स्वाध्यायींनी स्वतः श्रमदानाने निर्माण केल्या होत्या, तर २००१ साली दादांच्या सहस्रचंद्रदर्शनाच्या निमित्ताने गुजरातमध्ये पंधरा लाख स्वाध्यायींचा महामेळावा झाला होता. दादांची ग्रंथसंपदाही भारतीय विचारांचे, चिंतनाचे उदात्त दर्शन आहे. 'संस्कृती पूजन', 'दशावतार', 'वाल्मिकी रामायण', 'श्रीकृष्ण जीवनदर्शन', 'श्राद्ध' (भाग १-२), 'ऋषिस्मरण' इत्यादी अनेक विचारगर्भ पुस्तके लिहून दादांनी भारतीय ऋषिचिंतनाचे तेज व ओज दाखवून दिलेले आहे. दादांची वायय संपदा हे मराठीचे अक्षर वैभव आहे.

**- सतीश पाटणकर**

# सार्वजनिक क्षेत्रांतील कंपन्यांचे प्रारूप बदलण्याची गरज

विविध क्षेत्रांमध्ये केंद्र व विविध राज्य सरकारचे ३९०पेक्षा अधिक सार्वजनिक उपक्रम आहेत. गेल्या काही वर्षात या उत्पादन कंपन्यांनी संमिश्र कामगिरी अनुभवली आहे. काहींनी उल्लेखनीय यश मिळवले आहे तर अनेकांना स्पर्धात्मकता आणि वाढीला अडथळा ठरणाऱ्या आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. सार्वजनिक उपक्रमांमध्ये संरक्षण, अवजड अभियांत्रिकी, पायाभूत सुविधा क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. भारत हेवी इलेक्ट्रिकल्स, हिंदुस्थान एरोनॉटिक्स, स्टील अथॉरिटी ऑफ इंडिया सारख्या कंपन्या ऊर्जा सुरक्षा व संरक्षण क्षेत्रातील स्वावलंबनासह राष्ट्रीय प्राधान्यांना पाठिंबा देत आहेत.

हे उपक्रम रोजगार निर्मिती आणि प्रादेशिक आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरलेले आहेत. ज्या राज्यांमध्ये खासगी गुंतवणूक मर्यादित आहे तेथे परिणामकारक ठरले आहेत. आयातीवरचे अवलंबित्व कमी करण्यासाठी व देशांतर्गत उत्पादन क्षमतांना प्रोत्साहन देण्यासाठी 'मेक इन इंडिया' व 'आत्मनिर्भर भारत' मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील काही उपक्रम अग्रगण्य आहेत.

असे असले तरी उत्पादन उपक्रमांसमोर अनेक आव्हाने आजच्या काळामध्ये निर्माण झालेली आहेत. तंत्रज्ञानाच्या दृष्टिकोनातून हे उपक्रम अद्ययावत नाहीत. त्यांचे तंत्रज्ञान कालबाह्य ठरते. जागतिक पातळीवर स्पर्धा करण्यामध्ये अनेक उपक्रम मागे पडतात, प्रगत उत्पादन क्षमतांचा त्यांच्यात अभाव आहे.

सर्वात महत्त्वाचा अडथळा या कंपन्यांचे अकार्यक्षम प्रशासन व नोकरशाहीतील अडथळे हा आहे. या सर्व कंपन्यांना राजकीय हस्तक्षेपाचा मोठ्या प्रमाणावर सामना करावा लागतो. हा उद्योग कार्यक्षमपणे चालवण्यामध्ये अनेक अडचणी येतात. त्यातील महत्त्वाची अडचण म्हणजे निर्णय घेण्याची गती ही अत्यंत मारक असते. स्वायत्ततेचा अभाव ही मोठी सम स्या या उद्योगांना भेडसावत असते. कोणताही प्रकल्प वेळेमध्ये पूर्ण करणे या उपक्रमांना शक्य होत नाही. त्याचप्रमाणे जास्त कर्मचारी संख्या, अकार्यक्षमता, आधुनिकीकरण व विस्तारासाठी भांडवलाची मर्यादित उपलब्धता अशा गोष्टींमुळे आर्थिक शाश्वततेचा सामना करणे अवघड होते. भारताची बाजारपेठ वेगाने वाढत असली तरी या उद्योगांना स्थानिक व आंतरराष्ट्रीय स्तरावर तीव्र स्पर्धेचा सामना करावा लागतो.

खासगी कंपन्या किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील कंपन्यांमध्ये कार्यक्षमता व लवचिकता असते मात्र सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांना खराब पायाभूत सुविधा तसेच विखुरलेल्या पुरवठा साखळ्या यासारख्या आव्हानांमुळे स्पर्धा करणे जमत नाही. त्यामुळेच हिंदुस्थान फोटो फिल्म, हिंदुस्तान सॉल्टसब, एचएमटी मशीन टूल्स, राजस्थान इलेक्ट्रॉनिक्स, बीएचईएल, भारत पंप्स, अशा ६० पेक्षा जास्त कंपन्या सातत्याने तोट्यात असून त्यांचा एकत्रित तोटा एक लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

या पार्श्वभूमीवर सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये अद्ययावत तंत्रज्ञान तसेच संशोधन व विकास यात जास्त गुंतवणूक करणे अपरिहार्य आहे. या उपक्रमांच्या प्रशासनामध्ये अमुलाग्र बदल केला पाहिजे. त्यांना जास्त स्वायत्तता देऊन नोकरशाहीचा हस्तक्षेप कमी केला पाहिजे. चांगल्या संसाधन व्यवस्थापनाद्वारे योग्य गुंतवणुकीचा मार्ग शोधून आर्थिक अकार्यक्षमता या उपक्रमात निर्माण होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. आधुनिक उत्पादन प्रक्रियांसाठी कामगारांमध्ये कौशल्य निर्माण करण्यासाठी सुसज्ज प्रशिक्षण कार्यक्रम व्यापक प्रमाणावर राबवण्याची गरज आहे. केंद्र सरकारने खाजगी संस्थांबरोबर भागीदारी करून त्यांच्या माध्यम ातून कौशल्य तंत्रज्ञान आणि गुंतवणूक यांचे प्रश्न सोडवले पाहिजेत. अर्थव्यवस्था आणखी बळकट होण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादन कंपन्यांचे प्रारूप बदलण्याची म नसिकता केंद्र सरकारमध्ये निर्माण होण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

**- प्रा. नंदकुमार काकिर्डे**

## प्रेरणादायी यशोगाथा

# 'दहा वर्षांची हमाली ते आता शेतीतून १० लाखांचा नफा..'

करमाळा तालुक्यातील विहाळ गावचे दादा जाधव यांची ही प्रेरणादायी यशोगाथा. एक दशक पुण्यातील मार्केट यार्डात हमाल म्हणून राबलेल्या दादांनी २०१८ साली शेतीच्या ओढीने गावाकडे परतण्याचा निर्णय घेतला. कुटुंबीयांनी विरोध दर्शवला, पण दादांनी ठामपणे सांगितले, 'काही वर्षे शेती करून पाहीन, जमले नाही तर पुन्हा पुण्यात जाईन.'



पण शेती उतरल्यावर दादांनी खरोखरच चमत्कार घडवला. यावर्षी २० एकरांवर १६५ क्विंटल तुरीचे उत्पादन घेतले. दीड लाख रुपयांचा खर्च वजा जाता त्यांना तब्बल १० लाख ६२ हजार पाचशे रुपयांचा नफा मिळाला. एवढेच नाही तर आज दादा आपल्या हक्काच्या घराचे स्वप्नही प्रत्यक्षात आणत आहेत. पण मागील सहा वर्षे तोट्यात गेलेल्या या शेतात त्यांनी हे यश नेमके कसे मिळवले?

तर गेल्या वर्षी त्यांनी मित्रांसोबत 'पाणी फाउंडेशन'च्या 'फार्मर कप'मध्ये तीन दिवसांचे प्रशिक्षण घेतले. तिथे गटशेतीची संकल्पना समजली आणि डिजिटल शेतीशाळेचे नियमित विद्यार्थी झाले. नांगरणी, बीजप्रक्रिया, नैसर्गिक कीड नियंत्रण अशा अनेक गोष्टींचे ते शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेत राहिले. आत्मविश्वास वाढत गेला आणि दादांनी आणखी १० एकर जमीन भाड्याने घेतली. एकूण २० एकरांवर गोदावरी तुरीची लागवड केली.

गटशेतीच्या मदतीने एकत्रित निविष्ठा खरेदी, यांत्रिकीकरण आणि SOPs चे काटेकोर पालन यामुळे खर्चात घट आणि वेळेची बचत झाली. संपूर्ण क्षेत्रावर गादीवाफा तयार करण्यासाठी बीबीएफ मशीन व फवारणीसाठी ब्लोअरही खरेदी केला. गटातील सदस्य व पत्नीच्या सहकार्याने तुरीच्या संपूर्ण उत्पादन प्रक्रियेवर लक्ष केंद्रित केले आणि शेतीला नवसंजीवनी मिळाली. दादा अभिमानाने सांगतात, शेतीत काहीतरी नवे करण्याची इच्छा होती आणि फार्मर कपमुळे त्याला योग्य दिशा मिळाली. आता पुण्याला परत जाण्याचा प्रश्नच नाही.

# खुलताबादेत तिरंगा रॅली संपन्न

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद शहरात काश्मीर मध्ये पर्यटकांवर केलेल्या हल्ल्यानंतर भारतीय सैनिकांनी केलेल्या ऑपरेशन सिंदुरबद्दल सैनिकांप्रती अभिमान व्यक्त करण्यासाठी रविवारी (दि.२५) खुलताबादेत तिरंगा रॅली संपन्न झाली या तिरंगा रॅलीचे नेतृत्व गंगापूर खुलताबाद विधानसभा चे आम दार प्रशांत बंब यांनी केले,शिवाजी महाराजांचे पुतळ्याला अभिवादन करून भद्रा मारुतीचे मुख्य प्रवेशद्वारापासुन या तिरंगा रॅलीला सुरुवात करण्यात आली.

खुलताबाद शहरातील मोठी आळी,लहानी आळी,फर्श मोहल्ला, जुने बसस्थानक, साळीवाडा



मार्गे या रॅलीचे विसर्जन भद्रा मारोती मंदिरासम ोर झाले. या रॅलीत शहरासह, तालुक्यातील कार्यकर्ते,महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.यावेळी.जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती संतोष जाधव जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष एल जी गायकवाड.माजी सभापती भीमराव खंडाकडे.भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, शहराध्यक्ष परसराम बारगळ, ज्ञानेश्वर बारगळ,सुरेश मरकड, माजी उपनगराध्यक्ष नवनाथ बारगळ.माजी उपसभापती दिनेश अंभोरे,खिर्डीचे माजी सरपंच कृष्णा चव्हाण, सतीश दांडेकर, अविनाश कुलकर्णी. आशिष कुलकर्णी गणेश सावजी.करण राजपुत,योगेश बारगळ,राहुल हजारे.गंगापूर तालुका अध्यक्ष रवी चव्हाण, रजाक पठाण माजी सभापती अर्चना अंभोरे,रेखा चव्हाण. अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष मुक्तार पठाण. दिनेश कायस्थ. उपसरपंच गुलाब कुचे. यांचे सह मोठ्या संख्येने महिला मंडळी व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## 'आंबा मिलेट महोत्सव-२०२५ व पेट्रोल पंप' लोकार्पण सोहळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर येथील उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आंबा मिलेट महोत्सव-२०२५ व पेट्रोल पंपाचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. यावेळी राजस्थानचे महामहीम राज्यपाल हरिभाऊ नाना बागडे, छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट साहेब, आमदार अनुराधाताई चव्हाण, सभापती डॉ. राधाकिसन पठाडे, उपसभापती, सर्व संचालक मंडळ व शेतकरी बांधवांची उपस्थिती होती.**

# सलग सुट्ट्या अन लग्नसराईमुळे वेरूळ लेणीसमोर रहदारीची कोंडी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद खुलताबाद तालुक्यातील जगप्रसिद्ध वेरूळ लेणी येथे-सलग सुट्या अन लग्नाची दाट तिथी यामुळे शनिवारी (ता.२४) तालुक्यातील जगप्रसिद्ध वेरूळ लेणी समोर व बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिरासमोर भाविक,लग्नाला जाणाऱ्या वाहनांम ुळे एकच गर्दी झाली.

या मार्गावर वाहनांच्या गर्दीमुळे वेरूळ येथे वाहतुकीची कोंडी झाली होती,लेणी समोरील रस्ता अत्यंत अरुंद बनला असून,त्यात बाहेरुन येणारी वाहने सर्रास रस्त्याच्या कडेला लावली जात असल्याने



रहदारी ठप्प होण्याचा प्रकार नित्याचाच झाला असून, शनिवारी (दि.२४)भाविक,पर्यटक,लग्नाला जाणारी वाहने सगळीच एकत्र आल्याने चांगलीच वहातूक कोंडी झाली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४८४. email : attalmat@gmail.com.